# मेट्रो-३ ने गाठला १५ वा टप्पा

## आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलपर्यंतचे भुयारीकरण २० महिन्यांत पूर्ण

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. २ : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या पहिल्या भुयारी मेट्रो मार्गातील आझाद मैदान ते मुंबई सेंट्रल हा ३.८१४ किलोमीटरचा बोगदा शुक्रवारी (ता. २) पूर्ण झाला. 'वैतरणा-१' या यंत्राद्वारे केवळ २० महिन्यांत हे काम पूर्ण करण्यात आले.

आझाद मैदान ते मुंबई सेंट्रल हा 'डाऊन' दिशेकडील बोगदा पूर्ण करणारे मेट्रो-३ प्रकल्पातील 'वैतरणा-१' हे पहिले 'टीबीएम' (टनेल बोअरिंग मशीन) ठरले आहे. जमिनीच्या २० मीटरखाली बेसाल्ट आणि ब्रेसिया या कठीण दगडातून खोदकाम करत हा पल्ला गाठण्यात आला. या कामासाठी २७२० 'सेगमेंट रिंग' वापरण्यात आल्याची माहिती मेट्रो-३ च्या वतीने देण्यात आली. या मार्गातील हा १५ वा टप्पा आहे.



मेट्रो-३ भुयारी मार्गाचे काम वेळापत्रकानुसार आणि वेगात सुरू आहे. या भुयारीकरणादरम्यान अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. विशेष म्हणजे, या मार्गात १४ उंच इमारती, २८ ऐतिहासिक वारसा वास्तू आणि अत्यंत जुन्या इमारती आहेत. त्यापैकी एकाही वास्तूची कसल्याही प्रकारची हानी न होता हे आव्हानात्मक काम पूर्ण करण्यात आले.

> **भुयारीकरणाचे काम अतिशय आव्हानात्मक होते. या मार्गातील ऐतिहासिक इमारतींच्या पायाला धक्का न लागता काम पूर्ण झाले आहे.**
>
> **- अश्विनी भिडे,** व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन

### 'वैतरणा-१'ची कामगिरी

मेट्रो-३ मार्गाच्या ३१ किलोमीटर भुयारीकरणासाठी १७ महाकाय बोगदा खोदकाम यंत्रांचा (टीबीएम) वापर करण्यात आला आहे. मेट्रो-३ मार्गावरील मुंबई सेंट्रल स्थानक, मुंबई सेंट्रल एसटी व बेस्ट आगार, मुंबई सेंट्रल आणि मरिन लाईन्स या लोकल स्थानकांकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी सोईस्कर ठरणार आहे.